का.आ.क्र. २५/पोउआ/मुख्या—१/परवाने/२०१६
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
यांचे कार्यालय,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : २१/०१/२०१६

# कार्यालयीन आदेश क्र. २५/२०१६

**विषयः— हॉटेल व आदरातिथ्य उद्योगांना द्यावयाच्या परवान्यांबाबत....**

**संदर्भः— १) शासन राजपत्र आरएनआय क्र. एमएएचबीआयएल/२००९/३५५२७ दि २०/०१/२०१६ (असाधारण भाग चार—क)**
**२) शासन आदेश क्र. एमआयएस १२१५/प्रक्र.२/विशा—५/गृह विभाग, दि. २२/१२/२०१५.**
**३) शासन आदेश क्र. एमआयएस ०११४/प्रक्र. ४२६/विशा—५/गृह विभाग, दि. १२/०१/२०१६.**

हॉटेल व आदरातिथ्य उद्योगांना द्यावयाच्या परवान्यांबाबत प्राप्त झालेले शासन आदेश व प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेनुसार खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्र, जलतरण तलाव परवाना, परमिट रूम परवाना व लॉजिंग लायसन्स याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत असून सर्व संबंधितांनी आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

**(१) खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्रः—**

संदर्भ अधिसूचना क्रमांक १९४१२/१२३—सी—एडिएम, १९६९ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३३ पोट कलम (१) खंड (एक्सए), (वाय) अन्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी तयार केलेले **''बृहन्मुंबई खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्र नियम १९६९''** हे नियम रद्द करण्यात येत असून **आता खादयगृह नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे अथवा नुतनीकरणाचे अधिकार पोलीसांना नाहीत.**

**(२) स्विमींग पुल लायसन्सः—**

संदर्भ अधिसूचना क्रमांक २५५/टी/१९७२ व महाराष्ट्र शासन राजपत्र भाग—४ (क), दि. १३/११/२००३ (सुधारीत नियम) — मुंबई (महाराष्ट्र) पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा २२) याच्या कलम ३३, पोट—कलम (१) चा खंड (डब्ल्यु) (एक्स) व (वाय) अन्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी तयार केलेले **'The Greater Bombay Swimming Pool (Licensing & Controlling) Rules, 1972 ' (बृहन्मुंबई जलतरण तलाव (परवाना व नियंत्रण) नियम १९७२) हे नियम रद्द करण्यात येत असून आता जलतरण तलावांना परवाने देण्याचे अथवा नुतनीकरणाचे अधिकार पोलीसांना नाहीत.**

**(३) परमिट रूम परवाना** (PPEL-A) **व लॉजिंग लायसन्स (PPEL-B):—**

संदर्भ अधिसूचना क्रमांक २४६८८/१२३—ई—५८, दिनांक १७/१२/५२ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३३ पोट कलम (१) खंड (डब्ल्युए) (एक) अन्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी तयार केलेले **बृहन्मुंबई सार्वजनिक ठिकाणाचे करमणुक नियम १९५३** हे नियम रद्द करण्यात येत असून **आता पोलीस परवाना वर्ग—अ (परमिट रूम) व पोलीस परवाना वर्ग—ब (लॉजींग व बोर्डींग) परवाने देण्याचे अथवा नुतनीकरणाचे अधिकार पोलीसांना नाहीत.**

सही/—

( अनुप कुमार सिंह )
सह पोलीस आयुक्त (प्रशासन),
बृहन्मुंबई.